नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८९ Issue - 189 | वार शनिवार दि. २९ नोव्हेंबर २०२५ Blow- Saturday Date 29 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# निवडणुका होणारच, स्थगिती नाही

## महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीवर सुप्रिम कोर्टाचा मोठा निर्णय ; २१ जानेवारीला पुढील सुनावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडल्याच्या आक्षेपावर आज शुक्रवारी पुन्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवण्यात आली आहे.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांना स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. २८८ नगरपरिषदा,नगरपंचायतींच्या निवडणुका घोषणेप्रमाणे होणार आहे. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहणार, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितलं आहे. राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर आज सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली.

सर्वोच्च न्यायालयाने आजच्या सुनावणीत म्हटलं आहे की, 'मनपा, जि.प आणि पं.समित्यांच्या निवडणुकांना विलंब नको व्हायला. आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्था.स्व.संस्थांच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन आहेत. त्यामुळे पुढील सुनावणी २१ जानेवारीला असेल आणि त्यावेळी तीन न्यायमूर्तींचं खंडपीठ असेल', असंही न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. तसेच, 'राज्यातील २४७ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायती अशा २८८ स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये होत असलेल्या निवडणुका घोषित झाल्याप्रमाणे होऊ द्या. कोणत्याही निवडणुकांना आम्ही स्थगिती देत नाहीयत. बांठिया आयोगाचा अहवाल आम्हीही वाचला नाही, पण सध्या त्यालाच आधार मानतायत. ५० टक्क्यांची आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या सर्व ठिकाणच्या निवडणुका आमच्या आदेशाधीन राहणार. मनपा, जि.परिषदा, पं.समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण नको', असंही सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे.

निवडणूक आयोगाच्या ४ नोव्हेंबर २०२५च्या एकत्रित आदेशातील आचारसंहितेबाबत तरतूद सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार आता मतदान सुरु होण्याच्या दिवशीच्या आदल्या दिवशी रात्री १० वाचता प्रचाराची सांगता होणार आहे. म्हणजे, २ डिसेंबर २०२५ला मतदान पार पडत असल्यानं आदल्या दिवशी म्हणजे, १ डिसेंबर २०२५ला रात्री १० वाजता प्रचारकार्यक्रम थांबणार आहेत.

## भारताचा दुसऱ्या तिमाहीत जीडीपी ८.२ टक्क्यांवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या दुसऱ्या तिमाहीत भारताच्या जीडीपीची वाढ अपेक्षेपेक्षा अधिक गतीनं झाली आहे. जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढीचा वेग ८.२ टक्के इतका असल्याची माहिती केंद्र सरकारकडून देण्यात आली आहे. गेल्या वर्षी म्हणजेच २०२४-२५ या वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढीचा वेग ५.६ टक्के इतका होता. तर, एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत जीडीपी चा दर ७.८ टक्के इतका होता. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानं दुसऱ्या तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर ७ टक्के राहील असा अंदाज वर्तवला होता.



अर्थतज्ज्ञांच्या मते सणांच्यापूर्वी झालेली उलाढाल आण जीएसटीमधील सुधारणा याचा देखील जीडीपीच्या वाढीच्या दरावर झाला असावा. जीएसटीच्या स्लॅबमध्ये करण्यात आलेली कपात २२ सप्टेंबरपासून लागू झाली होती. म्हणजेच जीएसटीच्या दरकपातीचा पूर्णपणे परिणाम ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत दिसू शकतो. त्यापूर्वीच जुलै ते सप्टेंबर या दुसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढीचा दर ८.२ टक्क्यांवर पोहोचला आहे.

घरगुती उत्पादनांची आणि किराणा मालाची मागणी दस्या तिमाहीत वाढली होती. २२ सप्टेंबरपासून जीएसटीच्या स्लॅबमध्ये बदल करण्यात आले होते. वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी जीएसटीमधील बदलांमुळं सर्वसामान्यांच्या हतात २ लाख कोटी रुपये राहतील. त्यामुळं त्यांची खर्च करण्याची क्षमता वाढेल, असं म्हटलं होतं.

कृषी आणि खनिकर्म उद्योगातील वाढ वार्षिक निकषातील ३.१ टक्के इतकी नोंदवण्यात आली. जी आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ३.५ टक्के होती. तर, दुसऱ्या तिमाहीत या क्षेत्रातील वाढ ३.५ टक्के इतकी झाली आहे. या क्षेत्राची गेल्या वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीतील वाढ ४.१ टक्के इतकी होती.

उत्पादन आणि वीज उद्योगाची वार्षिक वाढ ८. १ टक्के इतकी झाली आहे. तर, दुसऱ्या तिमाहीत उत्पादन क्षेत्राची वाढ ९.१ टक्के इतकी वार्षिक आधारावर झाली आहे.

वित्तीय, रिअल इस्टेट, प्रोफेशनल सर्व्हिसेस क्षेत्राची वाढ जुलै ते सप्टेंबर या तिमाहीत १०.२ टक्के इतकी झाली आहे. जी गेल्या वर्षीच्या दुसऱ्या तिमाहीत ७.२ टक्के इतकी होती.

दरम्यान, आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत जीडीपीचा दर ८ टक्के राहिला आहे. ही आकडेवारी जीएसटीचे बदल पूर्णपणे लागू होण्यापूर्वीचे आहेत. ऑक्टोबर ते डिसेंबरमध्ये जीएसटी संदर्भात करण्यात आलेल्या बदलांचा परिणाम पाहायला मिळेल.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादलं आहे. सुरुवातीला भारतावर २५ टक्के टॅरिफ लादण्यात आलं होतं. त्याची अंमलबजावणी १ ऑगस्टपासून करण्यात येणार होती. रशियाकडून तेल खरेदी करत असल्यानं त्यात २५ टक्क्यांची वाढ करण्यात आली होती. त्याचा परिणाम दुसऱ्या तिमाहीत दिसून आला नाही. तिसऱ्या तिमाहीत ट्रम्प टॅरिफचा कसा परिणाम राहतो ते पाहावं लागेल.

## नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी १ डिसेंबरला रात्री १० पर्यंत प्रचाराची मुदत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नगरपरिषदा आणि नगरपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत असून, त्यासाठीच्या जाहीर प्रचाराची मुदत 'महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५' मधील तरतुदीनुसार १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० पर्यंत असेल.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांस संबंधित कायद्यांमधील तरतुदींनुसार घेतल्या जातात. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसंदर्भातील कायद्यात जाहीर प्रचाराचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार मतदान सुरू होण्याच्या अगोदरच्या दिवशी म्हणजे १ डिसेंबर २०२५ रोजी रात्री १० वाजल्यापासून प्रचार पूर्णपणे बंद होईल. त्यानंतर प्रचारसभा, मोर्चे आणि ध्वनिक्षेपकाचा वापर करता येणार नाही. त्याचबरोबर निवडणूक प्रचाराशी संबंधित जाहिरातींची प्रसिद्धी किंवा प्रसारण करता येणार नाही.

## सर्व सरकारी व खासगी आस्थापनांना पोश कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करावी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी सर्व सरकारी विभाग, निमशासकीय संस्था तसेच खासगी आस्थापनांनी प्रिव्हेशन ऑफ सेक्शुअल हॅरसमेंट क्ट कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती तातडीने गठीत करण्याचे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

**महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे ; पोश कायद्याचे उल्लंघन केल्यास ५० हजार दंड**

ज्या कार्यालये किंवा आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी कार्यरत आहेत, त्यांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट केले आहे.

राज्यातील शासकीय, निमशासकीय कार्यालये, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कंपनी, नगरपरिषद, तसेच शासन अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून निधी प्राप्त करणाऱ्या सर्व संस्थांमध्ये अंतर्गत समिती स्थापन करावी लागणार आहे. त्याचप्रमाणे खासगी कंपन्या, उद्योग, सेवा पुरवठादार संस्था, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, मनोरंजन क्षेत्रातील संस्था, क्रीडा संघटना, क्रीडा संकुले आदी सर्व खासगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे.

कायद्याप्रमाणे तरतुदींचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना प्रमुखास कलम २६ नुसार ५०,००० रुपयांपर्यंत दंड तसेच, उल्लंघनाची पुनरावृत्ती झाल्यास दंड दुपटीने वाढविणे, आस्थापनेचा परवाना रद्द करणे किंवा अन्य कठोर कारवाई करण्याची तरतूद आहे. अंतर्गत समितीची माहिती केंद्र सरकारच्या शी बॉक्स पोर्टलवर (हिशलेु,लव.सीं.ळप) अद्ययावतपणे अपलोड करावी.

तसेच नागरिक ज्या कार्यालये किंवा आस्थापनांना भेट देतील, त्या ठिकाणी अंतर्गत समितीचा फलक प्रदर्शित नसेल, तर त्याबाबत तक्रार १८१ या महिला हेल्पलाईनवर तक्रार करावी. असे आवाहनही आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

## कर्नाटक डेपोची बस थेट दरीत कोसळली, २०हून अधिक प्रवासी झाले जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : कर्नाटकातील उत्तर कन्नड जिल्ह्यात रायचूर- कारवार मार्गावर अपघाताची एक गंभीर घटना समोर आली आहे. रायचूर-कारवार केएसआरटीसी बस अनियंत्रित होऊन अंकोला तालुक्यातील वज्रळी येथील नवमी हॉटेलजवळ नॅशनल हायवे ६३ वर दरीत कोसळली. या भीषण अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली असून २० पेक्षा अधिक प्रवासी जखमी झाले आहेत. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. बसमध्ये महिलांसह लहान मुलांचाही समावेश होता. (ठरळलहींी घरीुरी क्ळसहुरू) राज्यात अपघातांची मालिका सुरूच असून मुंबई गोवा मार्गावर केमिकल ट्रक पलटी झाला असून कराड-विटा मार्गावर मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, बस चालकाचा अतिवेग हा अपघाताचे प्रमुख कारण असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. बस अचानक अनियंत्रित झाल्यानंतर चालकाला वाहनावर नियंत्रण ठेवता आले नाही आणि बस थेट दरीत कोसळली. अपघातानंतर परिसरातील स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. यल्लापूर आणि अंकोला पोलिसांनीही तत्काळ मदतकार्य सुरू करत जखमींना बाहेर काढण्यात मदत केली.

जखमी प्रवाशांना तातडीने अँब्युलन्सद्वारे जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आले असून गंभीर जखमींवर उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले असून संपूर्ण प्रकरणाची नोंद अंकोला पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. या अपघातामुळे काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती. दरम्यान, राज्यात इतर ठिकाणीही अपघातांच्या मालिका घडताना दिसत आहेत. कराड-विटा मार्गावर मध्यरात्री झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी झाले आहेत. ओगलेवाडी येथे रेल्वे स्टेशन ब्रिजजवळ ही धडक एवढी जोरदार होती की नेक्सन कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, नेक्सन कार आणि टेम्पो यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात ओमकार थोरात (२८) आणि गणेश थोरात (२५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. मृत दोघेही कराड तालुक्यातील ओंड गावचे रहिवासी होते. घटनेत ऋषिकेश थोरात आणि रोहन पवार हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.


## राजेश अग्रवाल महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव



मुंबई : सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची महाराष्ट्राचे नवे मुख्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान मुख्य सचिव राजेश कुमार हे येत्या ३० नोव्हेंबर रोजी सेवानिवृत्त होत असून राजेश अग्रवाल त्यांच्याकडून ३० नोव्हेंबर रोजी पदभार स्वीकारतील.

राजेश अग्रवाल हे भारतीय प्रशासकीय सेवेतील महाराष्ट्र कॅडरचे १९८९ चे अधिकारी असून त्यांचे मूळ गाव पंजाबमधील जालंधर हे आहे. त्यांनी कॉम्प्युटर सिस्टिम विषयामध्ये बी.टेक केले आहे. राजेश अग्रवाल यांनी सेवाकाळात सहायक जिल्हाधिकारी रत्नागिरी, जिल्हा परिषद जळगाव येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, अकोला येथे जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सदन नवी दिल्ली येथे उप विशेष आयुक्त, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, भारत निवडणूक आयुक्त कार्यालयात संचालक, मंत्रालय मुंबई येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव, इंटर्नल एक्स्चेंज ऑफ इंडिया नवी दिल्ली येथे राष्ट्रीय अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, मंत्रालय मुंबई येथे कृषी आणि मत्स्यव्यवसाय विभागात सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागात सचिव (अतिरिक्त कार्यभार), वित्त विभागात सचिव, सामान्य प्रशासन विभागात प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान), वित्त विभागात लेखा व कोषागारे विभागात सचिव पदाचा अतिरिक्त कार्यभार, वित्त विभागात सचिव (लेखा व कोषागारे)(व्यय - अतिरिक्त कार्यभार), केंद्र सरकारच्या वित्त सेवा विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या आदिवासी विकास विभागात सह सचिव, केंद्र सरकारच्या कौशल्य विकास विभागाचे महासंचालक (प्रशिक्षण), अशा विविध पदांवर काम केले आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.



प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी,पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### आदेश 'जैसे थे'

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडू नका असा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता राज्याचे निवडणूक आयोग सक्रिय झाल्याचं दिसतंय. निवडणुकीत ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण मर्यादा ओलांडणार नाही, त्यासाठी जिथं जास्त आरक्षण कोटा असेल तिथं पुन्हा सोडत करण्यात येणार असल्याची सूत्रांनी माहिती दिली. सुप्रीम कोर्टातली पुढली सुनावणी २१ जानेवारीला होणार आहे. मात्र सर्व निवडणुका कोर्टाच्या संभाव्य आदेशाधीन राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला स्थगिती न देता ती ठरलेल्या वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या नगरपालिका निवडणुकीची प्रक्रिया कायम राहणार आहे. मात्र ज्या ठिकाणी ओबीसी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे त्या ठिकाणचा निकाल हा न्यायालयाच्या संभाव्य निकालाच्या अधीन राहील असा निर्णय दिला आहे. तसेच राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महाालिकेच्या निवडणुकीत आरक्षणाची मर्यादा न ओलांडता निवडणुका घ्या असे निर्देशही दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर आता ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडली आहे त्या जिल्हा परिषद आणि २ महापालिकांमध्ये नव्याने आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. जिथ जास्त आरक्षण झाले तिथं महिला ओबीसी, महिला आरक्षण सोडत नव्याने काढण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. नव्यानं आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. डिसेंबर महिन्यात जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक व्हावे यासाठी हालचाली सुरू आहेत. त्यामुळे या निवडणुका लांबणीवर पडतील याची शक्यता कमी आहे.

# स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि अनुदीप फाउंडेशन यांच्या समन्वयातून स्वेरीत मेगापूल कॅम्पस ड्राईव्हचे उद्घाटन

## सुमारे २५ कंपन्या आणि १५०० पेक्षा जास्त पदवीधरांचा सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) आणि 'अनुदीप फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये आज दि.२८ नोव्हेंबर आणि उद्या दि. २९ नोव्हेंबर २०२५ रोजी 'मेगापोल कॅम्पस ड्राईव्ह'चे आयोजन करण्यात आले आहे. आज रोजी पंढरपूर पोलीस स्टेशनचे उपविभागीय पोलीस अधिकारी मा. प्रशांत डगळे, अनुदीप फौंडेशनचे विभागीय व्यवस्थापक नरेंद्र मौर्य तसेच पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सायन्स अँड टेक्नोलॉजी विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार या मान्यवरांच्या शुभहस्ते व विविध कंपन्यांच्या मानव संसाधन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून




उद्घाटन करण्यात आले.

या उद्घाटन समारंभाच्या सुरुवातीला अनुदीप फौंडेशनच्या मा.वाहबीझ यांनी अनुदीप फौंडेशनच्या कार्याबद्दल सर्वांना माहिती दिली. त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व अध्यक्ष तसेच विविध कंपन्यांचे मानव संसाधन अधिकारी यांचे स्वागतपर सत्कार करण्यात आले तसेच अनुदीप फौंडेशनच्या वतीने स्वेरीचे प्रतिनिधी म्हणून स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या सायन्स अँड टेक्नोलॉजी विभागाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार हे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि, 'विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी शरीर आणि मन या दोन गोष्टींवर नियंत्रण मिळवले पाहिजे तसेच आपले ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन या तीन महत्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.' या उद्घाटनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पंढरपूर पोलीस स्टेशनचे उपविभागीय पोलीस अधिकारी मा. प्रशांत डगळे हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले कि, 'जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी 'प्रेरणा' आणि 'शिस्त' या दोन गोष्टींमधला फरक जाणून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी न ससा बनायचे आहे न कासव तर त्यांनी ससा आणि कासव यांच्या मधील दोन्ही गुणांचा अवलंब करायचा आहे. शिस्त हि आपली सवय असली पाहिजे तसेच मनाच्या विरुद्ध जाऊन कार्य करण्यासाठी आपल्याकडे शिस्त असणे फार गरजेचे आहे.'

स्वेरीमध्ये आयोजित या पूल कॅम्पसमध्ये जवळपास २५ हुन अधिक कंपन्या सहभागी झाल्या आहेत. या कॅम्पस ड्राईव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कोअर आयटी, मॅनेजमेंट, बँकिंग तसेच इतर संबंधित क्षेत्रात विविध नोकरींच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या पूल कॅम्पस ड्राईव्हसाठी सोलापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील पंधराशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंद केली आहे. सदर पुल कॅम्पस ड्राईव्ह शुक्रवार दि. २८ आणि शनिवार दि. २९ हे दोन दिवस चालणार आहे. अनुदीप फाउंडेशन सोबत 'आयबीएम' या जगविख्यात कंपनीचे देखील सहाय्य मिळत आहे. या कंपनीच्या सोशल रिस्पॉन्सिलिटीच्या माध्यमातून ही संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केली जात आहे. यासाठी नरेंद्र मौर्य, अमित दास, राहील शेख आणि अनुदीपची टीम स्वेरीत कार्यरत आहे. संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील, डॉ. एस.एम. खोमणे व त्यांचे सहकारी हे या पूल कॅम्पसच्या यशस्वीतेसाठी प्रयत्नशील आहेत. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. यशपाल खेडकर यांनी केले तर अनुदीप फौंडेशनच्या मा. वाहबीझ यांनी सर्वांचे आभार मानले.

# भोईरपाडा येथे कंटेनरच्या धडकेत रिक्षाचालकाचा मृत्यू; भिवंडीत तालुक्यात अपघातांनी चिंता वाढली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी शहरात सोबतच ग्रामीण मध्ये सुद्धा कंटेनर व जडवाहतूक वाहनांमुळे होणारे अपघात दिवसेंदिवस




वाढत चालले आहेत. बुधवारी पडघा पोलीस स्टेशन हद्दीतील भोईरपाडा येथिल बी. जी. आर. लॉजिस्टिक पार्कच्या गेटजवळ आणखी एक भीषण अपघात घडला. तर नुकताच भिवंडी शहरातील एपीजे अब्दुल कलाम आझाद उड्डाण पुलावर सहा वर्षीय बालिकेचा कंटेनरच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. भिवंडी तालुक्यातील गोदाम पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भोईरपाडा गावाच्या हद्दीतील मुंबई-नाशिक महामार्गावर बुधवारी सायंकाळी प्रवासी घेण्यासाठी रिक्षा बाहेर उभे असलेल्या शरीफ मंहमूद शेख (वय ३७, रा. अर्जुनली) यांना भरधाव वेगाने आलेल्या कंटेनरने जबर धडक दिली. या धडकेत त्यांचा जागीच मृत्यू झाला. मृतदेह पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले असून, अपघाताचा गुन्हा नोंद करून कंटेनर चालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पडघा पोलीस पुढील तपास करत आहेत. या सलग अपघातांमुळे परिसरात नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी असून, कंटेनर आणि जडवाहतूक वाहनांना ठराविक वेळेतच वाहतुकीस परवानगी द्यावी, अशी जोरदार मागणी होत आहे. रहदारी नियमांची अंमलबजावणी अत्यावश्यक असून, स्थानिक नागरिक व रिक्षाचालक संघटनांनी खालील वाहतूक नियम कडकपणे लागू करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे. कंटेनर वाहनांसाठी निश्चित वेळापत्रक लागू करणे (शहर व गाव हद्दीत दिवसा बंदी/नियंत्रित वाहतूक). महामार्ग व लॉजिस्टिक पार्क परिसरात वेगमर्यादा कठोरपणे पाळणे आणि वेग नियंत्रणासाठी कॅमेरे बसवणे. पादचारी व वाहनचालकांसाठी चेतावणी फलक, झेब्रा क्रॉसिंग, स्पीड ब्रेकरची वाढ.

वाहतूक पोलिस तैनाती वाढवून ट्रॅफिकची नियमित तपासणी. अवैध, नंबर-प्लेट किंवा लाईट नसलेल्या कंटेनर वाहनांवर त्वरित कारवाई या नियमांची अंमलबजावणी

होणे गरजेचे आहे. तर स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, योग्य नियोजन आणि कडक अंमलबजावणी नसल्यास असे अपघात थांबणार नाहीत. जडवाहतूक नियंत्रणासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# शासन निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी शिवपाणंदचा ऐतिहासिक एल्गार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : तमाम महाराष्ट्रातील शेवटच्या शेतकरी भावापर्यंत दर्जेदार शेतरस्ता पोहोचवण्यासाठी आणि शेतरस्त्यांशी संबंधित कायमस्वरूपी अडचणी दूर करण्यासाठी 'शिव पाणंद शेतरस्ता चळवळ' निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे.

शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी हा नारा प्रत्यक्षात उतरवण्यासाठी चळवळीने एकात्मता आणि सामूहिक नेतृत्वाचा व्यापक दृष्टिकोन स्वीकारला आहे.

गुरुवार, २७ नोव्हेंबर २०२५, रोजी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकाऱ्यांनी आझाद मैदान, मुंबई येथे समन्वय बैठक घेतली. पुढील आंदोलनाची दिशा, जनजागृती आणि संवाद यावर महत्त्वपूर्ण निर्णय ठरवण्यात



आले.

राज्यभर प्रशासन, शासन आणि न्यायालयीन पातळीवर सातत्यपूर्ण संघर्ष करून, अनेक तालुके-जिल्ह्यांत संघटन बळकट केली आणि सरकारचे लक्ष वेधले. या प्रयत्नांना प्रतिसाद देत राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक ऐतिहासिक निर्णय जाहीर केले. चळवळीच्या वतीने सरकारचा सन्मान व आभारही व्यक्त करण्यात आले.

जिल्हा-तालुका प्रशासनाकडून निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी पदाधिकारी मंत्रालयात भेटी देत, संबंधित विभागांना निवेदने सादर करून सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आहेत.

मंत्रालयातून शेत तिथे रस्ता - गाव तिथे समृद्धी या राज्यव्यापी जनजागृती अभियानाचा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. ग्राम, तालुका आणि जिल्हा पातळीवर हे अभियान भव्य व प्रभावीपणे राबवून शासननिर्णयांचा लाभ सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा पक्का निर्धार पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला यावेळी महाराष्ट्र राज्य शिव पाणंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, ड.सागर जोरी,ड. प्रणाली यवले,शांताराम पानमंद, जेष्ठ पत्रकार शिवाजी राऊत,सचिन शेळके,रामहरी बोंबे, दत्तात्रय बांगर,सुरेश भुजबळ,संजय साबळे,बबन गुंड,भाऊसाहेब वाळूंज, दशरथ वाळूंज,संजय जाधव,संजना जाधव,स्वप्नील कोहकडे आदी राज्यभरातील पदाधिकारी मोठ्या संखयेने उपस्थित होते.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे संविधान दिन साजरा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला प्रास्ताविकामध्ये सौ रेणुका गवल मॅडम यांनी संविधानाचे महत्त्व उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना सांगितले सदर दिनाचे सूत्रसंचालन संस्थेचे शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळे सर यांनी केले प्रथम भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पूजन करून दीप प्रज्वलनाने सदर संविधान दिनाचे उद्घाटन करण्यात आले त्यानंतर संविधान दिनाचे संविधान प्रस्तावना याचे सामूहिक वाचन करण्यात आले त्यानंतर संविधान शपथ घेण्यात आली सदर संविधान दिनाकरिता उपस्थित असलेले सर्व मान्यवरांचा सत्कार संस्थेचे गटनदेशक श्री गणेश काशीद सर व ज्येष्ठ निदेशक श्री एम जी नदाफ सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले आपल्या मार्गदर्शनपर प्रस्तावनामध्ये संविधान अभ्यासक व संविधान प्रचारक प्राध्यापक श्री सागर सोनकांबळे यांनी भारतीय राज्यघटनेला ७५ वर्ष पूर्ण झालेली आहेत व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान १९४९ रोजी अमलात आल्याची जाणीव उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना करून दिली भारताची अखंडता टिकून ठेवण्यासाठी हे संविधान बनवलेले आहे भारतीय लोकशाही टिकून ठेवण्यासाठी हे संविधान बनवलेला आहे या संविधानाचे सर्वांनी सन्मान करणे गरजेचे आहे त्याचप्रमाणे संविधान हे सर्वांना सोबत घेऊन जाणे म्हणजेच समाजवाद होय याची जाणीव उपस्थित प्रशिक्षण त्यांना करून दिली. संविधानाने सामाजिक दरी नष्ट होते सर्वांना समान हक्क संविधानाने दिला संविधानाने शोषणाविरोधात आपण दाद मागू शकतो आणि संविधानामध्ये धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिलेला आहे सर्व अल्पसंख्यांक समाजाची धार्मिक संस्कृती टिकवणे या संविधानामध्ये नमूद केलेले आहे त्याचप्रमाणे भारतीय संविधानाचे सर्व नागरिकांनी सन्मान केला पाहिजे आणि संविधानाचा प्रचार केला पाहिजे याची जाणीव उपस्थित प्रशिक्षणार्थ्यांना श्री सागर सोनकांबळे यांनी करून दिले त्यानंतर आरोग्य दूत श्री विकी बाबा चौधरी यांनी त्यांच्या मार्गदर्शनामध्ये संविधानामध्ये महिलांना बळकट स्थान मिळालेले आहे गोरगरिबांना न्याय देणारे हे संविधान आहे आणि सर्वांना सोबत घेऊन समान न्याय मिळवण्यासाठी ची ताकद या संविधानामध्ये आहे याची जाणीव करून दिली त्यानंतर सदर संविधान दिन कार्यक्रमाचा समारोप सर्व उपस्थित शिक्षक वर्ग व प्रशिक्षणार्थी राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला सदर संविधान दिनानिमित्त संस्थेचे आयएमसी सदस्य श्री कमलाकर सोनकांबळे उपस्थित होते आणि सामाजिक कार्यकर्ते श्री शांत घोडके उपस्थित होते सदर संविधान यशस्वी करण्यासाठी संस्थेचे प्राचार्य श्री प्रदीप हरिदास व संस्थेचे गटनदेशक श्री गणेश काशीद सर यांचे मार्गदर्शन लाभले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील ज्येष्ठ निदेशक बोंगाळे सर गवल मॅडम बगले सर वाघमारे सर लिंबे सर खंदारे सर मंठाळे सर कोणापुरे सर बिराजदार सर स्वामी सर व श्री माडेकर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर बसस्थानावरील अस्वच्छ शौचालयाबद्दल आगार व्यवस्थापक निलंबित!



## परिवहनमंत्र्यांनी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला पुन्हा एकदा दिली भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : आज दि. २८ नोव्हेंबर रोजी (शुक्रवार) परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी सोलापूर मध्यवर्ती बसस्थानकाला पुन्हा एकदा भेट दिली. या भेटी दरम्यान शौचालय, पाणपोई सारख्या सर्वसामान्य प्रवासी व नागरिकांनी पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सुविधा कडे अक्षम्य दुर्लक्ष केल्या प्रकरणी सोलापूर आगाराचे ' आगार व्यवस्थापक ' यांना निलंबित करण्याचे आदेश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

आज दुपारी मध्यवर्ती बसस्थानकावरील शौचालयाची पाहणी केली असता, तेथील अस्वच्छता आणि दुर्गंधीयुक्त परिसर पाहून संबंधित अधिकाऱ्यांना चांगले धारेवर धरले. शौचालयाचे व्यवस्थापन बघणाऱ्या खाजगी संस्थेकडून शौचालयाची डागडुजी करण्यात आली नव्हती, अनेक ठिकाणी फरशा उखडल्या होत्या. तसेच स्वच्छता देखील ठेवण्यात आली नव्हती. तसेच जवळच असलेल्या पाणपोई परिसरात देखील अत्यंत अस्वच्छता असल्याचे त्यांना आढळून आले. पाणपोईच्या ५ नळा पैकी केवळ एकच नळ सुरू होता. या बाबतीत उपस्थित आगार व्यवस्थापक व वाहतूक नियंत्रक यांना समाधान कारक उत्तरे देता आली नाहीत. त्यामुळे संबंधित आगार व्यवस्थापक यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करण्याचे निर्देश मंत्री महोदयांनी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना तात्काळ दिले.

विशेष म्हणजे मागील आठवड्यात उपरोक्त त्रुटी दूर करून प्रवाशांना चांगल्या सुविधा निर्माण करून देण्याचे निर्देश आपल्या आकस्मिक पाहणी दौऱ्यात मंत्री सरनाईक यांनी संबंधितांना दिले होते.

याबाबत पुढील दौऱ्याच्या वेळी पुनश्चः तपासणी करण्यात येणार असून त्यानंतर देखील प्रवासी सुविधा मध्ये हलगर्जीपणा आढळून आल्यास संबंधित अधिकाऱ्यांच्या वर निलंबनाची कारवाई करण्यात येईल असा सज्जड दम देखील भरला होता. परंतु सोलापूर बस स्थानकावरील या गैरसोयीबद्दल कोणताही बदल स्थानिक प्रशासनाकडून करण्यात न आल्यामुळे अत्यंत नाईलाजाने संबंधित आगार व्यवस्थापकांना निलंबित करण्याचे निर्देश मंत्र्यांना द्यावे लागले आहेत. तथापि, राज्यातील एसटीच्या २५१ आग- ार प्रमुखांनी या घटनेकडे अत्यंत गंभीरपणे पहावे आणि प्रवाशांच्या सोयी सुविधांच्या बाबतीमध्ये विशेषत: बसस्थानकावरील म हिला प्रसाधनगृहाच्या बाबतीमध्ये कोणत्याही प्रकारची हलगर्जी यापुढे खपवून घेतली जाणार नाही.असे स्पष्ट निर्देश यावेळी मंत्री सरनाईक यांनी दिली आहेत.

# बोरीवली ग्रामपंचायतीकडून नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव :

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीने नागरिकांसाठी मोठा दिलासा जाहीर केला आहे. चालू वर्षाचा संपूर्ण कर तसेच थकबाकीची ५० टक्के रक्कम एकरकमी भरल्यास, निवासी मालमत्ता, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करात तब्बल ५०% सवलत देण्यात येणार आहे.



ही सवलत फक्त अभियान कालावधीत – ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत लागू आहे. ग्रामपंचायत हद्दीतील निवासी मालमत्ता कर, पाणीपट्टी आणि दिवाबत्ती करात दिल्या जाणाऱ्या या सवलतीचा लाभ घेण्यासाठी नागरिक पुढाकार घेत असल्याची माहिती ग्राम पंचायतीतर्फे देण्यात आली आहे.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत ३१ डिसेंबरपर्यंत थकबाकीदारांसाठी मोठी संधी**

योजनेनुसार, २०२५-२६ या चालू आर्थिक वर्षाचा संपूर्ण कर एकरकमी भरणे बंधनकारक आहे. तसेच १ एप्रिलपूर्वीची थकबाकी भरताना लागू होणारी ५० टक्के सवलत मिळवण्यासाठी उर्वरित थकबाकीची रक्कमदेखील एकरकमीच जमा करावी लागणार आहे.

सवलतीचा लाभ मिळण्यासाठी ग्रामपंचायतीने नागरिकांना वेळेत कर भरण्याचे आवाहन केले असून, अनेक नागरिकांनी सवलतीचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे.

**अटी व नियम :**

चालू वर्षाचा (घरपट्टी, पाणीपट्टी, दिवाबत्ती) संपूर्ण कर एकरकमी भरणे आवश्यक.

१ एप्रिलपूर्वीची थकबाकी ५०% सवलतीसह एकरकमी भरावी.

सवलत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंतच उपलब्ध.

निवासी मालमत्ता धारकांनी या योजनेचा लाभ घेऊन थकबाकी कमी करण्याचे आवाहन बोरीवली ग्रामपंचायतीकडून करण्यात आले आहे.

# मतदार ओळखपत्राव्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे मतदानासाठी ग्राह्य : निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मतदानासाठी निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र (एझखउ) व्यतिरिक्त अन्य १२ ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून, त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर मतदारांना मतदान करता येईल, अशी माहिती, निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता मतदान दि. ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. ज्यांच्याकडे मतदार ओळखपत्र आहे, असे मतदार मतदान केंद्रावर आपली ओळख पटविण्यासाठी मतदार ओळ- खपत्र सादर करतील.

मतदार ओळखपत्र नसणाऱ्या मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. भारतीय पारपत्र (पासपोर्ट), आधार ओळखपत्र, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), आयकर विभागाकडील पॅन कार्ड, केंद्र शासन, राज्य शासन, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना फोटोसहीत दिलेली ओळखपत्रे , राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, राष्ट्रीयकृत बँक अथवा पोस्ट ऑफिस यामधील खातेदाराचे फोटो असणारे पासबुक, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र, निवृत्तीवेतनाची फोटो असलेले दस्तावेज अथवा पासबुक, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, स्वातंत्र्य सैनिकाचे फोटो असलेले ओळखपत्र, कामगार मंत्रालयाद्वारा वितरित आरोग्य विमा स्मार्ट कार्ड असे १२ पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.

**मतदान कक्षात मोबाईल नेण्यास बंदी**

मतदारांनी मतदान केंद्रावर जाताना मतदार माहिती चिठ्ठी आणि मतदार ओळखपत्र किंवा वरील १२ पैकी कोणताही एक मुळ पुरावा सोबत घेवून जाणे आवश्यक आहे.

तसेच मतदान कक्षात मोबाईल नेण्यास बंदी असेल.

# श्री विठ्ठल कारखान्यावर स्वर्गीय आ. भारत नाना भालके यांची पुण्यतिथी साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तालुका पंढरपूर विन गुरसाळे वेणूनगर, येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे कारखान्याचे माजी चेअरमन स्वर्गीय आ भारत नाना भालके यांच्या पाचवी पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे विधीपूर्वक पूजन कारखान्याची संचालक संभाजी भोसले यांच्या शुभहस्ते, चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील व संचालक मंडळाच्या उपस्थित करण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारखान्याची संचालक सर्वश्री कालिदास साळुंखे, प्रवीण कोळेकर, सिद्धेश्वर बंडगर, अशोक घाडगे गणेश ननवरे, कार्यकारी संचालक श्री डी आर गायकवाड, तसेच कारखान्याची सभासद वाहतूक तोंडीदार शेतकर अधिकारी कर्मचारी व हितचिंतक मोठ्या संख्येने उप- स्थित होते. उपस्थित सर्व संचालकांनी स्वर्गीय आ. भारत नाना भालके यांना आदरांजली वाहिली.

# छायाताई खंडागळे यांना 'प्रेरणा पुरस्कार २०२५' लॉर्ड बुद्धा टेलिव्हिजनच्या वर्धापन दिनी गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधत आंबेडकरी चळवळीत निष्ठेने व समर्पण भावनेने कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यंदा 'प्रेरणा पुरस्कार २०२५' द्वारे सन्मान करण्यात आला. लॉर्ड बुद्धा टेलिव्हिजनच्या १५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या भव्य कार्यक्रमात मुंबईतील समाजसेविका छायाताई संजय खंडागळे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नरिमन पॉईंट, यशवंतराव चव्हाण येथे या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.बोधगया, बिहार येथील भदंत हर्षबोधी तसेच



माजी मंत्री व आमदार राजकुमार बडोले यांच्या शुभहस्ते छायाताई खंडागळे यांचा गौरव करण्यात आला. समाजातील वंचित, घटक घटकांमध्ये बौद्ध विचारांची रुजवात, महिलांच्या हक्कांसाठी सातत्याने केलेले प्रयत्न, शिक्षण व सामाजिक न्यायासाठी त्यांनी बजावलेली भुमिका याची दखल घेत हा मानाचा सन्मान त्यांना देण्यात आला.कार्यक्रमाला विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, मान्यवर, तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मानानंतर आपल्या भावना व्यक्त करताना छायाताई खंडागळे म्हणाल्या की, हा सन्मान केवळ माझाच नसून समाजासाठी कार्य करणाऱ्या प्रत्येक हाताचा, प्रत्येक पावलाचा गौरव आहे. बाबासाहेबांनी दाखवलेल्या मार्गावर ठामपणे चालत राहण्याची प्रेरणा हा पुरस्कार मला देतो.

**प्रसिद्ध हिंदी सिनेअभिनेते मुकेश खन्ना यांचे विचार**

# युद्ध-आतंक हे कोणत्याही समस्येवरील उपाय नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आज संपूर्ण जगात अशांतता माजली आहे. बॉम्बहल्ले, दंगे, आतंकवाद वाढत चालला असून साम्राज्यवादी देशात युद्धाची स्पर्धा अधिकच वाढली आहे. युद्ध – आतंक हे कोणत्याही समस्येवर उपाय नाही. अहिंसा आणि विश्वशांतीसाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे विचार शक्तिमान आणि म हाभारत कार्यक्रमातील भीष्म पितामह फ ेम व प्रसिद्ध सिनेअभिनेते मुकेश खन्ना यांनी व्यक्त केले. एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, कोथरूड, पुणे आयोजित ३० व्या तत्त्वज्ञ संत श्री ज्ञानेश्वर व संत श्री तुकाराम महाराज स्मृती व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.




यावेळी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड रिसर्च(आयसर) चे अध्यक्ष डॉ. अरविंद नातू, यशदा या आयएस अकादमीचे संचालक, रंगनाथ नाईकडे, डॉ. बी. एस. नागोबा, दूरदर्शनचे माजी कार्यकारी अधिकारी डॉ. मुकेश शर्मा, डॉ.मिलिंद पात्रे, डॉ. दिपेंद्र शर्मा, डॉ. भरत चौधरी आदी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड हे होते.

मुकेश खन्ना म्हणाले, आजची मुले ही उद्याच्या भविष्य आहे. मोबाईल च्या आभासी जगात हीच मुले खूप गुंतलेली दिसतात. त्यामुळे ती अधिक अस्वस्थ आहेत. मोबाईलच्या अतिवापर पासून त्यांना दूर ठेवणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी नैतिकतेची शिकवण देण- ारी संस्कृतची शिक्षण व्यवस्था आणायला हवी.

रंगनाथ नाईकडे म्हणाले, संतांचे विचारच आज विश्वबंधुत्वाचे बीज पेरू शकतात. आज लहान मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये संत साहित्य रुजवण्याची गरज असून योगा, मेडिटेशन, अध्यात्मामुळे आजची मुले सक्षम होतील. उत्तुंग ध्येयाची भरारी घेण्यासाठी विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण शिक्षण देणे हाच उपाय आहे.

डॉ. अरविंद नातू म्हणाले, विज्ञान आणि अध्यात्म या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. विज्ञान मानवी आरोग्यासाठी कृत्रिम औषध उपचार देते. अध्यात्म हे मेडिटेशन, योगा, ध्यान धारणेच्या माध्यमातून प्राकृतिक आरोग्य उपचार देते. अलीकडे लोकांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. सामाजिक व मानसिक स्वास्थ्यासाठी अध्यात्म हाच एकमेव उपाय आहे.

डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, विश्वशांतीसाठी काम करणाऱ्या सर्वांना एकत्र जोडण्यासाठी ही व्याख्यानमाला दरवर्षी आयोजित केली जाते. ज्ञानोबा तुकोबांचा संपूर्ण जगाला जोडणारा विचार हाच आजच्या विनाशकारी जगात एक आशेचा किरण आहे. केवळ विश्व मानव- ताच जगात शांती आणू शकते. आपण सर्वजण या मार्गाचे पाईक होऊया.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन गाडेकर यांनी केले. डॉ. मिलिंद पात्रे यांनी प्रास्ताविक व आभार व्यक्त केले.

# जि.प तांदुळवाडी शाळेत महात्मा फुले यांना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तांदुळवाडी येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फ ुले यांच्या १७५ व्या स्मृती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना थोर विचारवंत आणि कृतीशील आचरणातून सम ाजाला योग्य दिशा देणारे महात्मा फुले समजावताना जोतिराव केवळ त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळेच नव्हे तर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आरोग्य,एक कॉन्टॅक्टर (स्थापत्य), इतिहासकार,कवि, लेखक, नाटककार, शेती यातही काळाच्या कितीतरी पुढे जाऊन विचार करणारं व्यक्तीमत्व होते याबद्दल अतिशय सोप्या पद्धतीने मुलांना समजावून सांगितले, शाळेतील सहशिक्षक श्री संतोष मोहिते सर आणि श्रीमती आशा पवार यांनीही याप्रसंगी समायोचित मार्गदर्शन केले. कु.ऋजुता मोरे हिने जोतिराव फुले यांच्या बद्दलचे गीत गायले.तर चि .संघरत्न राऊत आणि सार्थक धाबेकर यांनी भाषण केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सयाजी शिंदे, रसिका आगरकर सुजाता कदम यांनी प्रयत्न केले.

# घरफोडी करणारे आंतरराज्यीय दोन सराईत चोरटे जेरबंद

## १३.३ तोळे सोन्याचे दागिने व १ किलो ८०४ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकुण २०,००,१८० रु.किंमतीचा मुददेमाल हस्तगत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (प्रतिनिधी) : सोलापुरात घरफोडी करणारे आंतरराज्यीय दोन सराईत चोरट्यांना सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून १३.३ तोळे सोन्याचे दागिने, व १ किलो ८०४ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकुण २०,००,१८०/- रु.किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला आहे.

सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी श्री. सतिश शिवप्पा सोलापूरे वय-६२ वर्षे, व्यवसाय :- सेवानिवृत्त, रा. घर नं. ३८, कित्तूर चिन्नम्मा नगर, विजापूर रोड सोलापूर हे दि.२१/११/२०२५ रोजी तळमजल्याच्या घरास कुलूप लावून, वरच्या मजल्यावर जावुन झोपले होते. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांचे तळमजल्याच्या बंद घराचे कडी-कोयंडा व कुलूप तोडून घरातील कपाटात ठेवलेले सुमारे ४,८७,८००/- रु. किंमतीचे सोन्याचे दागिने चोरुन नेले बाबत त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन विजापूर नाका पो.स्टे सोलापूर शहर येथे गुन्हा रजि नं. ५७७/२०२५ भा.न्या. सं.२०२३ कलम ३३१(४), ३०५ (ए) प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तसेच त्याच दिवशी रात्री तक्रारदार नामे श्री. एल.श्रवणकुमार लगुन वय-३९ वर्षे, व्यवसाय :- नोकरी, रा.

**सोलापूर शहर गुन्हे शाखेची धडाकेबाज कामगिरी**

सध्या रा. बी-७१, पाटील नगर, सैफुल, विजापूर रोड, सोलापूर याचे देखील बंद घराचे अज्ञात चोरटयाने कडी, कोयंडा व कुलूप तोडून, घरातील कपाटात ठेवलेले सुमारे १९,३३,०००/- रु. किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरुन नेले.

तसेच सदर परिसरात राहणा-या सौ. पुजा सचिन जाधव यांचे घरात देखील चोरी करण्याचा प्रयत्न झालेला होता. विजापूर नाका पोलीस ठाणे हददीत एकाच रात्रीत ०३ ठिकाणी अज्ञात चोरटयांनी घरफोडी-चोरी केल्याने, वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी नमुद गुन्हे लागलीच उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आदेशीत केले होते.

वरील घडलेल्या घरफोडीच्या घटनांचे गांर्भिय ओळखुन, श्री. अरविंद माने वरिष्ठ पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा, सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळास भेट दिली. घटनास्थळाचे परिसरातील प्राप्त सी.सी.टी.व्ही फुटेज व संकलित केलेल्या इतर तांत्रीक माहितीच्या आधारे सदरचा गुन्हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांनी केल्याची पथकाने खात्री केली. त्यादरम्यान सदरचा गुन्हा करणारे दोन इसमांबाबत सपोनि श्री. शैलेश खेडकर यांचे पथकातील पोलीस अंमलदार- इम्रान जमादार यांना गोपनीय बातमी मिळाली की, चोरी करणारे सराईत गुन्हेगार नामे- (१) राघवेंद्र उर्फ रघू उर्फ नागराज



शंभू नाईक, वय- ३२ वर्षे, मुळ रा. येडगुंजी मंदिर जवळ, मण्णेगीगांव ता. होन्नावार जि. कारवार राज्य कर्नाटक व त्याचा साथीदार नामे (२) लक्ष्मण उर्फ लकी मारुती नाईक, वय-२८ वर्षे, मुळ रा. सदाशिव नगर, बेळगांव राज्य कर्नाटक सध्या रा. वसूर, बेळगांव राज्य कर्नाटक हे त्यांनी चोरी केलेले सोने व चांदीचे दागिने विक्री करण्यासाठी ते समर्थ सोसायटी ए.जी.पाटील कॉलेज परिसरात रात्रीच्या वेळी येणार आहेत. त्याअनुषंगाने पथकाने सदर ठिकाणी सापळा लावला असता, बातमीतील वर्णनाचे सराईत गुन्हेगार हे त्याठिकाणी आल्याचे दिसताच त्यांना ताब्यात घेतले व त्यांचे झडतीमध्ये वर नमूद गुन्ह्यातील सोने व चांदीचे दागिने मिळून आले असता सदर मुद्देमालासह ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांना सदर मुददेमालाबाबत विचारणा केली असता, त्यांनी सदरचा मुददेमाल हा सैफुल येथील तीन घरे फोडून चोरी केला असल्याचे कबूल केले. तसेच सदरचा मुददेमाल हा त्यांनी विजापूर येथे विकण्याचा प्रयत्न केला परंतू तेथे मुददेमाल पावत्या नसल्याने, तो मुददेमाल कोणी विकत घेत नसल्याने, आम्ही सोलापूर येथे अनोळखी गि-हाईक पाहून सदरचा मुददेमाल विक्री करणार असल्याचे सांगितले. त्यावरून नमूद दोन्ही आरोपींना सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे.

अशा प्रकारे शहर गुन्हे शाखेकडील स.पो.नि.शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने नमूद गुन्ह्यातील १३.३ तोळे सोन्याचे दागिने व १ किलो ८०४ ग्रॅम चांदीचे दागिने व वस्तू असा एकुण २०,००,१८०/- रु. किंमतीचा मुददेमाल हस्तगत करुन, विजापूर नाका पो.स्टे हददीत घडलेला गंभीर स्वरुपाचा घरफोडीचा गुन्हा अत्यंत कमी वेळात, कौशल्याने व अविरत परीश्रमाने उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उपायुक्त, गुन्हे, श्री.राजन माने, सहा.पोलीस आयुक्त गुन्हे तसेच श्री. अरविंद माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. श्री. शैलेश खेडकर व पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, राजेश मोरे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, महेश रोकडे, इब्राहिम शेख, चालक बाळासाहेब काळे, घोरपडे तसेच सायबर पो.स्टे कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड, रतिकांत राजमाने यांनी केली आहे.

# समाजातील विषमता नष्ट करणे हे ज्योतिबा फुले यांचे ध्येय होते : डॉ. शहाजी चंदनशिवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परांडा/प्रतिनिधी : परांडा दि. २८ नोव्हेंबर २०२५ समाजातील विषमता नष्ट करणे तळागाळापर्यंत शिक्षण पोहचवणे हे ज्योतिबा फुले यांचे ध्येय होते. महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी कार्य केले असे प्रतिपादन महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे यांनी क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या



पुण्यतिथी निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना केले. शिक्षण महर्षी गुरुवर्य रा गे शिंदे महाविद्यालय परंडा येथे दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव यांच्या नेतृत्वाखाली आणि महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ महेश कुमार माने यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा फुले यांच्या पुण्यतिथीचा अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महाविद्यालयातील उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने प्रा विलास गायकवाड यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने कार्यालयीन अधीक्षक श्रीमती पद्मा शिंदे सांस्कृतिक प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ अतुल हुंबे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ अरुण खर्डे ग्रंथपाल डॉ राहुल देशमुख डॉ सचिन चव्हाण रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ अक्षय घुमरे हिंदी विभाग प्रमुख डॉ बाळासाहेब राऊत वाणिज्य विभाग प्रमुख डॉ संभाजी गाते राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा जगन्नाथ माळी प्रा संतोष काळे प्रा प्रताप घुटे प्रा अनंत अनुभुले यांच्यासह कनिष्ठ वरिष्ठ विभागातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक जगन्नाथ माळी यांनी मानले.

# तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा जाहीरनामा नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रणितीताई भालके यांनी केला जाहीर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ च्या निवडणुकीच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. प्रणिती भालके यांन तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा जाहीरनाम जाहीर केला आहे.

तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगराचे पदाचे अधिकृत उमेदवार डॉक्टर प्रणिता ताई भालके यांनी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा जाहीरनामा त्यांच्या ऑफिसमध्ये जाहीर केला आहे.

स्वर्गीय आ. भारत नाना भालके यांच्या पाचव्या पूर्ण स्पर्धा निमित् त्यांना आदरांजली वाहून त्यांनी आज रोजी तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा जाहीरनामा जाहीर केला आहे.

यावेळी उपस्थित मा श्री भगीरथ भालके, श्री अनिल दादा सावंत, मनसे नेते दिलीप बापू धोत्रे, शिवसेना नेते साईनाथ भाऊ अभंगराव, माजी नगरसेवक सुधीर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उद्योग व्यापार प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे, धुमाळ, यादव, विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक, व पंढरपूर शहरातील भालके यांच्यावर प्रेम करणारे सर्व कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ज्ञानोबा माऊलीचे कार्य सातासमुद्रापार स्टॅण्डफोर्ड विद्यापीठात नेणार : सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सर्व समाजासाठी ज्ञानाचे दरवाजे उघडणाऱ्या ज्ञानोबा माऊली यांचे कार्य साता समुद्रापार स्टॅण्डफोर्ड विद्यापीठात नेण्यात येईल, असे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले.







संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती वर्षानिमित्त वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आज मोगरा फुलला या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात गणेश शिंदे व संच यांनी सादरीकरण केले.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या जयंती वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य विभागामार्फत करण्यात येणार आहे. यामध्ये तालुकास्तरीय कार्यक्रम, मोगरा फुलला हा जिल्हास्तरीय कार्यक्रम, नाट्य, विद्वत्त परिषद, विमोचन विविध राज्यांमध्ये कार्यक्रम, नाणे व टपाल तिकीट इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

विष्णुदास भावे नाट्यगृहात झालेल्या मोगरा फुलला या कार्यक्रमास रसिक प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

# महात्मा फुले चौक सुशोभीकरण कृती समिती कळंब तर्फे म.फुले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनीधी/सुधाकर रणदिवे : थोर समाजसुधारक, सामाजिक शैक्षणिक राजकीय व्यवसायिक कृषी उद्योग व साहित्य क्षेत्रात काळाच्या पुढे जाऊन विचार करणारे असामान्य व्यक्तिमत्व, क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या १७५ व्या स्मृती दिनानिमित्त कळंब तहसील कार्यालया समोरील क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले चौक येथे सुशोभीकरण समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले.समितीचे अध्यक्ष श्री तुळशीराम माळी, सचिव तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाचे राज्य सरचिटणीस श्री संतोष भोजने यांच्या सह बिभीषण यादव,धिरज दुधाळ,प्रेमचंद गोरे, शहाजी शिरसाट,सचिन डोरले, श्री पांडुरंग तात्या कुंभार , श्री.दत्ता माळी, डॉ अशोक शिंपले, श्री जयपाल शिंदे, श्री कोयले सर, एड.श्री राजपाल देशमुख साहेब, सिद्धेश्वर सातव इ फुले प्रेमी उपस्थित होते.



**मतदान यंत्र सीलिंग प्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न**

**शेवटच्या टप्प्यावर येऊन पोहोचली आहे निवडणूक**

# सिंदखेड राजा नगरपरिषद निवडणुकीसाठी प्रशासनाची जय्यत तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

मा. राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेला असून दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी ई. व्ही. एम. मशीन सिलिंग करण्याचे काम मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले.

मतदान यंत्र सिलिंग करण्यापूर्वी सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना दिलेल्या प्रशिक्षणाचा मतदान केंद्र सिलिंग करताना खूप मोठ्या प्रमाणात फायदा झाला, मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.

मा.निवडणूक निरीक्षक श्री. जी पी साबळे यांनी आज नगर परिषद सिंदखेडराजा येथे मतदान यंत्र सिलिंग केंद्राला आज भेट दिली. आजच्या या भेटीदरम्यान श्री. साबळे यांनी सिंदखेड राजा येथील ई. व्ही. एम. सिलिंगच्या कामकाजाचा आढावा घेतला तसेच महत्वपूर्वक मार्गदर्शन केले.

नगर परिषद निवडणूक आता शेवटच्या टप्प्यावर येऊन पोहचली आहे, दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया



पार पडणार असून त्याच्या साठीची लागणारी तयारीबाबतचा आढावा मा. निवडणूक निरीक्षक श्री. साबळे यांनी घेतला.

सिंदखेडराजा नगर परिषद निवडणूक २०२५ साठी मतदारसंघांमध्ये एकूण २१ मतदान केंद्र असून त्यासाठी एकूण ५ सिलिंग टीमने आज काम पूर्ण केले आहे. प्रत्येक टीम मध्ये एक झोनल अधिकारी, दोन ग्राम महसूल अधिकारी, एक महसूल सेवक असे एकूण ४ कर्मचारी-अधिकारी काम करत आहेत. आजच्या ई. व्ही. एम. मशीन सिलिंग प्रक्रियेसाठी उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते, शिल्प निर्देशक उद्धव मांटे यांनी मतदान यंत्र तयार करणाऱ्या पत्रकाचे सनियंत्रण अधिकारी म्हणून काम पार पडले.

मा.निवडणूक निरीक्षक श्री. साबळे यांनी नगर परिषद येथील ई. व्ही. एम. सुरक्षा कक्षाला ला भेट देली तसेच सर्व व्यवस्थाची पाहणी करून कशाप्रकारे ई. व्ही. एम. ला सुरक्षा प्रदान केली जात आहे याची खातरजमा करून घेतली तसेच सिंदखेडराजा नगर परिषद निवडणूक तयारी संबंधी समाधान व्यक्त केले.

आजच्या या ई.व्ही.एम.मशीनचे सिलिंगचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी मा.निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण टीमने युद्धपातळीवर काम केले आहे आणि ई. व्ही. एम. सिलिंग ची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी मेहनत घेतली आहे. त्यासाठी मा. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी डॉ. आशिष बोबडे, तहसीलदार सिंदखेडराजा अजित दिवटे , गट विकास अधिकारी सिंदखेड राजा अजितकुमार बांगर , नायब तहसीलदार सिंदखेड राजा डॉ. प्रवीणकुमार वराडे, प्र. नायब तहसीलदार नितीन बढे,कृषी अधिकारी भागवत किंगर, गट शिक्षण अधिकारी स्वप्नील निकम, उप अभियंता गिरीश मालोकार, महिला व बालविकास अधिकारी जीवन राठोड, प्रसार माध्यम नोडल अधिकारी प्रकाश शिंदे, ग्राम महसूल अधिकारी राहुल देशमुख, सुशील शिलवंत,शिवानंद वाकदकर, भास्कर गिरी,स्वप्नील देशमुख, विष्णू थोरात,वासुदेव जायभाये, विलास कटारे,प्रवीण झिने, गोरख पवार, शहर अभियंता हमीद काझी, कार्यालय अधीक्षक प्रभू वाघ, नगर रचना सहाय्यक वृषाली घाणे, कनिष्ठ अभियंता अवधूत कापसे, कनिष्ठ अभियंता रजत मराठे, गजानन मेहेत्रे,राजेश ढेले, मनोज मेहेत्रे,गंगा हरकळ,अमोल चौधरी,विजय जाधव इत्यादी तसेच सर्व राजकीय पक्षांचे उमेदवार उपस्थित होते. वरील सर्व निवडणूक कर्मचारी अधिकारी यांनी सिलिंग प्रक्रिया पूर्ण पाडली.